मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या कार्यालयात स्वाक्षरीसाठी सादर केल्या

शिक्षण संचालक सुधीर बोनाटे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

निदर्शन... राज्याचे शिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्या बोगस पदवीप्रकरणी राष्ट्र

# पाणी, मातीचे गोळा केले नमुने

## प्रदूषण मंडळ लागले कामाला : लवकरच कायदेशीर कारवाई करण्याची शक्यता

**औरंगाबाद :** औरंगाबाद तालुक्यातील सुखना धरणासह अनेक गावांवर विषप्रयोग करणाऱ्या रॅडिको डिस्टिलरीज्‌ला आतापर्यंत पाठीशी घालणारे प्रदूषण नियंत्रण मंडळ 'लोकमत'च्या स्टिंग ऑपरेशननंतर शासनाकडून दबाव वाढताच सोमवारी अखेर कामाला लागले. या विभागाने सोमवारी रॅडिको ते सुखना या पंधरा किलोमीटर नाल्याच्या अंतरात फिरुन तेथून पाणी व आजूबाजूच्या मातीचे नमुने गोळा केले. त्याचा रिपोर्ट कंपनीविरोधात आला असल्याचे सूत्राने सांगितले. या कंपनीवर एक-दोन दिवसांमध्ये कडक कायदेशीर कारवाई होण्याची शक्यताही सूत्राने व्यक्त केली.

'लोकमत'ने रॅडिकोच्या या विषप्रयोगाने स्टिंग ऑपरेशनने बिंग फोडल्यानंतर सोमवारी एकच खळबळ उडाली. पर्यावरणमंत्री रामदास कदम यांनाही त्याची दखल घ्यावी लागली.

कदम यांनी या प्रकरणाची चौकशी करून तातडीने अहवाल सादर करण्याचे आदेश प्रदूषण मंडळाला दिले. कदम यांचे आदेश आणि नागरिकांचा वाढलेला रोष पाहून अखेर सोमवारी प्रदूषण मंडळाने रॅडिकोतून निघणारे पाणी सुखनात कसे पोहोचते, ते किती विषारी आहे, याची पाहणी करीत पाण्याचे व आसपासच्या जमिनीचे नमुने घेतले.

या चौकशीचा एक प्राथमिक अहवाल मुंबईला पाठविण्यात आला आहे. अंतिम अहवाल बुधवारी मुंबईला पाठविण्यात येणार असल्याचे प्रदूषण मंडळातर्फे सांगण्यात आले. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार प्रदूषण मंडळाने पाठविलेला अहवाल कंपनीविरुद्धच आहे. कंपनीच्या या कृत्यामुळे परिसरातील पर्यावरणावर अत्यंत घातक परिणाम होत असल्याचे अहवालात नमूद असल्याचे सूत्रांनी सांगितले.

### राजकीय दबाव आला नाही, तर...

◆ प्रदूषण नियंत्रण मंडळाने तयार केलेला चौकशी व तपासणी अहवाल हा कंपनीच्या विरुद्ध आहे. जर कोणताही राजकीय दबाव आला नाही, तर अहवालावरून कंपनीविरुद्ध येत्या एक, दोन दिवसांमध्ये कठोर कायदेशीर कारवाई होऊ शकते, असे सूत्राचे म्हणणे आहे.



टाकळी वैद्य शिवारात एका शेतकऱ्याच्या शेततळ्यातच असे रसायन आणून फेकण्यात आले आहे.

## 'खाम नदी'प्रमाणे गुन्हे नोंदवा

**औरंगाबाद :** सुखना धरणात विष कालविणाऱ्या रॅडिको या कंपनीविरुद्ध खाम नदी प्रदूषित करणाऱ्या मंडळींवर केलेल्या कारवाईप्रमाणे गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी इको नीड्स फाऊंडेशन या संस्थेने केली आहे.

खाम नदीत स्टर्लाईट कंपनीचे घातक रसायन ओतणाऱ्या आगा खान, सुमित खांबेकर आदींविरुद्ध शहर पोलिसांनी कठोर कारवाई करून त्यांना हर्सूल कारागृहात पाठविले आहे.

गेल्या चार महिन्यांपासून या आरोपींची जमानतदेखील झालेली नाही. शहर पोलिसांच्याच धर्तीवर ग्रामीण पोलीस का कारवाई करीत नाहीत, असा प्रश्न फाऊंडेशनने जिल्हा पोलीस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनात उपस्थित केला आहे.

सुखना नदी दूषित करणाऱ्या आरोपींविरुद्ध 'वॉटर ॲक्ट'प्रमाणे कारवाई न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा रोहित थोरात, सुरेश कांबळे, लक्ष्मण वाकळे, अतुल आठवले, ॲड. अत्तदीप आगळे, ॲड. सरोदे यांनी दिला आहे.

नियोजन : झाडे लावण्यापेक्षा ती जगविण्या